

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३३९

काशन

# द्रिका

## अभिनव काव्यसंग्रह

REFBK-0022236
REFBK-0022236

संपादिका-सौ. सीता कुलकर्णी. एम्.ए.बी.एड्.

चि. शरद ह्यांस -
सौ. माईकडून
ता. १०-७-७७ चिंचवड.

# मधु-चंद्रिका

द.चे.दोत.
ठाणे.
भेट संग्रह
काव्य
२२२३६
२०७०५
२३३०

संपादिका-सौ. सीता कुलकर्णी
M. A. B. Ed.
अर्थात कवयत्री - के. विनया

REFBK-0022236
REFBK-0022236

किंमत रु. ७=५०

चंद्रकिरण प्रकाशन - पुणे.

प्रकाशक :-डॉ. स. ना. कुलकर्णी
१३५३ शुक्रवार पेठ
नातूबाग-पुणे-२.



कार्यवाह तथा सहसंपादिका :-
**सौ. रेखाराजलक्ष्मी कुलकर्णी**
B A. (Hon.), Foreign Return

© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

२२ जून-१९७७

मुद्रक :-मा. प. तळेकर
श्री दत्त मुद्रणालय
३३५ शनिवार पेठ, पुणे-३०.

## — अर्पण पत्रिका —

महान योगी ( सुपुत्र )

प्राध्यापक कै. गोविन्द तथा भाऊसाहेब कुलकर्णी

M. A. ( Hon. )



ज्याच्या कृपा-दृष्टान्तामुळे मी काव्यसृष्टीत पदार्पण केले त्या महानयोगी, पुण्यपुरुष, पुण्यात्म्याचे पुण्यस्मृतीस सश्रद्ध अन्तःकरणाने सदर अल्पसेवा सादर समर्पण

—संपादिका

परी गीता ईश्वर भोळा ।
ले व्यासोक्ति कुसुममाळा
तरी माझि या दुर्वांदळा
ना न म्हणे की

—( ज्ञानेश्वरी )

## आशीर्वाद

शिवा हरा तू दुरिता निवारी
नेत्राग्निने त्या खल दुष्ट मारी
सिद्धेश्वरा तू वरदान देई
सुखी भारता ठेव सदैव आई

—सत्यभामा तनय ( शिवदास )

# प्रस्तावना

एखाद्या मधमाशीने वेगवेगळ्या सुगंधी फुलांवर झेपावून मधुकण गोळा करावेत आणि आपल्या पोळ्यामध्ये त्यांचा संचय करावा त्यप्रमाणे सौ. सीता कुलकर्णी यांनी 'मधुचंद्रिका' या कवितासंग्रहाचे संपादन केले आहे. अगदी नवीन कवींना त्यांच्या कविता मुद्रित स्वरूपात पहाण्याची हौस असते आणि ते अगदी स्वाभाविक आहे. परंतु वेगवेगळ्या साप्ताहिकांतून व मासिकांतून त्यांची वर्णी लागत नाही कविता जरी चांगली असली तरी ती लिहिणारा कवी नवीन असतो. त्याचे नाव कुणाला परिचित नसते. त्यामुळे ती कविता 'साभार परत' येते. किंबहुना संपादक ती कविता परत पाठविण्याच्या भानगडीत न पडता सरळ केराच्या टोपलीत टाकतो. अनेक कविता वेगवेगळ्या नियतकालिकांकडे वारंवार पाठवूनही एकाही कवितेला प्रसिद्धी मिळत नाही, असे पाहिल्यावर कवी नाराज होतो, निराश होतो आणि अखेरीस आपली काव्यलेखनाची ऊर्मी दाबून ठेवतो. अशा अनेक कवींना प्रकाशात आणून त्यांना उत्तेजन द्यावे या सद्हेतने यांनी तसे आवाहान केले. लागलीच महाराष्ट्रात विखुरलेल्या अनेक कवींकडून कविता येऊ लागल्या. इतक्या प्रमाणात की संपादिका संभ्रमात पडल्या. इतक्या सगळ्या कविता छापणे परवडण्यासारखे नव्हते आणि बऱ्याच कविता अगदीच सामान्य होत्या. त्या सर्व कवितांमधून थोडीफार गुणवत्ता असलेल्या कविता त्यांनी निवडल्या आणि ही 'मधुचंद्रिका' वाचकांना सादर केली.

१९३३ साली मी 'सुगी' या नावाचा जानपदगीतांचा संग्रह प्रसिद्ध केला होता. साधारणतः याच पद्धतीने आवाहन करून मी कविता मागवल्या होत्या. शिवाय मी अनेक सुप्रसिद्ध कवींकडून त्यांच्या जानपदगीतांची मागणी केली होती. महाराष्ट्रातल्या कवींच्या जानपदगीतांचा ( ग्रामीण गीते हा पर्यायी शब्द ) प्रातिनिधिक संग्रह प्रकाशित करावा, हा माझा हेतू होत . प्रस्तुत संग्रहाच्या संपादिकेचा हेतू वेगळा होता. त्याचा उल्लेख मी वर केला आहे. याच मांडवाखालून मी एकवार गेलो असल्यामुळे साहजिकच मला या संग्रहाबद्दल आपुलकी वाटली आणि प्रस्तावना लिहिण्यास आनंदाने संमती दिली.

के. विनया या नावाने कविता लिहिणाऱ्या सौ. सीता यांनी आपल्या सहा कविता या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. या कवितांतून त्यांची तरल कल्पनाशक्ती, निसर्गप्रेम व सुभग रचनाशैली प्रतीत होते 'संपादकीय' मध्ये ज्या 'स्वप्नजल्लोष' या कविता-संग्रहाचा उल्लेख आला आहे तो मी वाचला. त्यातल्या एकाही कवितेला शीर्षक नाही. ही पद्धत मला लक्षणीय वाटते. लोकगीतांना कुठे शीर्षके असतात ! संतकवीच्या ओव्या-अभंगांच्या शिरांवर शीर्षकांचे अलंकार आढळत नाहीत.

या संग्रहात सुमारे शेहेचाळीस कवींच्या एकूण पंचाऐंशी कवितांचा समावेश आहे. ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक भक्तिपर व भावगीतात्मक असे बहुविध काव्यप्रकार या कवींनी हाताळले आहेत. बहुतेक कविता जातिवृतांत लिहिलेल्या असून यमकबद्ध आहेत. मुक्तछंदाची पेरणीही अधून मधून आढळते. मात्र समाधानाची बाब अशी की जुन्या प्रसिद्ध कवितांचे ढोबळ व आंधळे अनुकरण करण्याचा हेतुपूर्वक यत्न सहसा दिसत नाही आणि दुसरी समाधानाची बाब अशी की सगळे कवी नवीन असूनही नव-काव्याचा पाठपुरावा कोणी केलेला नाही. दुर्बोधता नाही, भेसूर कल्पनांचा खेळ नाही, वैफल्याची निशाणी नाही आणि मुख्य म्हणजे प्रतिमांचा सोस नाही. पंचायशी कवितांच्या या संग्रहात उण्यापुऱ्या दहा प्रतिमाही नाहीत.

फार खोल न जाता ढोबळपणे मी असे म्हणू शकतो की काही कविता सामान्य आहेत, कांही बऱ्या आहेत व काही खरोखरीच चांगल्या आहेत. उत्कृष्ट कवितेची अपेक्षा मी केलीच नव्हती. काव्याच्या उद्यानातली ही सगळी नुकतीच रुजलेली रोपटी आहेत. त्यांना कळ्या-फुले लहडायला अजून अवकाश आहे काही रोपटी तरारून वाढतील व कालांतराने त्यांना फुले येतील अशी अपेक्षा करायला हरकत नाही. मात्र त्यासाठी संपादिकेने सुचविलेला उपाय त्यांनी आचरणात आणायला हवा. जुने काव्य, नवे काव्य व इंग्रजी भाषेतले काव्य यांचे सतत वाचन करायला हवे नुसते वाचन नव्हे तर अभ्यास, चिंतन आणि मनन. काव्याची प्रतिभा ही जन्मजात असते. ती नसली तरी एवढा सगळा खटाटोप करूनही उपयोग नाही. ज्याच्या ठायी प्रतिभेचा उन्मेष आहे तो मात्र अभ्यास, चिंतन व मनन यांच्या साहाय्याने पुढे व पुढेच सरकतो.

— ग. ल. ठोकळ

## संपादकीय

"मधु चंद्रिका" काव्य-रसिकांचे सेवेस सादर करताना मला फार आनंद होत आहे २६ जानेवारीला रात्री ९ चे सुमारास सहज एका बाल कवीने 'स्वप्न जल्लोष' ची कल्पना माझेसमोर मांडली. ती १५ दिवसांचे आत साकार झाली. सदर काव्य-पुस्तिका काही वाचनालये तथा मासिके, वर्तमानपत्रे यांना भेट म्हणून पाठविली ती वाचून काही नवोत्साही, नवोदित कवींची पत्रे आली की वर्तमानपत्रात सदर कल्पना जाहीर झाली असती तर आम्हीही यांत भाग घेतला असता.

सदर नवोत्साही नवोदित कवींना प्रोत्साहन देण्याकरिता "अभिनव काव्यसंग्रह" काढण्याचे जाहीर केले. संपूर्ण महाराष्ट्रातून चांगलाच प्रतिसाद मिळाला.

भावनेच्या उद्रेकात कविता निर्मिती होते. कविता निर्मितीनंतर ती प्रकाशात यावी; असे कवी मनास वाटत असते पण तशी सन्धी मिळतेच असे नाही. आणि त्यामुळेच कवी मन निराश, खिन्न होते. त्यातून कधी कधी कविता करणेच थांबते वा निराशेने भरलेली काव्यकृती निर्माण होण्याची शक्यता असते. असे होऊ नये याकरिता सदर कवींना कविता प्रकाशात येण्याची संधी देण्याचा हा अल्पसा प्रयत्न मी केला आहे.

मला जरा सांगावेसे वाटते :-

एकदा माझे सुदैवाने आधुनिक वाल्मीकि ग. दि माडगूळकर यांचे व्याख्यानाचा लाभ मला झाला. व्याख्यानात पदापदी असंख्य काव्यपंक्ति दृष्टांत म्हणून सांगत होते. त्यांत हिन्दी, संस्कृत, मराठी व इंग्लिश या सर्व भाषांमधील प्राचीनतम कवीपासून चालू काळापर्यंतच्या सर्व कवींच्या काव्य वाङ्मयाचा उपयोग त्यानी केला होता. यावरून कवीला किती वाचावे वाटते हे आपल्या ध्यानात येते. ते सर्ववाचन शास्त्रीय व मननपूर्वक केल्याचे व्याख्यानात स्पष्ट होत होते. त्यातही विशेष म्हणजे– दोहा, वृत्ते, छन्द ही निर्माण होण्याला घडलेली मूळ कारणेही त्यांनी स्पष्ट केली.

यावरून नवोदित कवींनी काव्यवाचन खूप करावयास पाहिजे. कविवर्यांची काव्यासंबंधीची व्याख्याने ऐकली पाहिजेत. त्यांचे मनन-चिन्तन केले पाहिजे असे मला वाटते.

तसेच आपल्या कवितेस प्रसिद्धी मिळाली नाही म्हणून ती कविता कमी प्रतीची आहे असे समजावयाचे कारण नाही. निराश न होता काव्यरचना करण्यात प्रयत्नशील राहिलेच पाहिजे; शिवाय विविध क्षेत्रे, विविध विषय यांवर काव्यरचना करण्याचा प्रयत्न करावयास हवा.

सुप्रसिद्ध कवींच्या कविता मननपूर्वक वाचून आपल्या कवितेचे परीक्षक आपणच होऊन तिचा दर्जा आपणच ठरवावा. दुसऱ्यांच्या कवितेवर द्वेष भूमिकेतून टीका करू नये. शुद्ध मनाने दुसऱ्यांच्या कवितेतील उत्तमोत्तम काव्यगुणांचे परीक्षण केले असता; आपोआप आपली प्रतिभा प्रागल्भ होऊ लागते. कवितेचा दर्जा वाढतो; व ती रसिकादरास पात्र ठरते.

या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झालेल्या कवितांशी संपादिका सहमत असेलच असे नाही.

सौ. सीता कुलकर्णी
१३५३, शुक्रवार, पुणे २.

-x-

---


## स्मारकास सहाय्य करा.

" **क्रान्ति-वीर जयरामबाबा** " किं.-तीन रुपये फक्त.
जयरामबाबा हे स्वार्थत्यागी, प्रसिद्धीपराङ्मुख असे स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांचे स्मारक व्हावे या हेतूने त्यांचे चरित्र प्रसिद्ध केले आहे. कृपया आपण या पुस्तकाची किमान एक प्रत खरेदी करून या सत्कृत्यात सहभागी व्हावे.

**पुस्तके मिळण्याचे ठिकाण : १३५३, शुक्रवार, पुणे २.**

## आभार

मधुचंद्रिका हा अभिनव काव्यसंग्रह प्रकाशित करताना ज्या ज्या व्यक्तींचे साहाय्य झाले त्या सर्वांची, विशेषतः या संग्रहात भाग घेणाऱ्या सर्व कवीमंडळींची तसेच श्री. श्यामकांत सातपुते, डॉ. स. ना. कुलकर्णी, हेमंतकुमार कुलकर्णी, श्री दत्त मुद्रणालयाचे, मालक श्री. माधवराव तळेकर व प्रेसचे सर्व कर्मचारी, सुप्रसिद्ध कवीवर्य श्री. ग. ल. ठोकळ यांनी वेळ नसतानाही वेळात वेळ काढून प्रस्तावना लिहिली, चंद्रकिरण प्रकाशनच्या कार्यवाह सौ. रेखाराजलक्ष्मी कुलकर्णी आमचे उपक्रमाला प्रोत्साहन देऊन आत्मविश्वास वाढविण्याला कारणीभूत झालेले श्री. त्र्यं. ल. कुलकर्णी (सहसंपादक तरुण भारत, पुणे.) या सर्वांची मी मनःपूर्वक आभारी आहे.

सौ. सीता कुलकर्णी संपादिका

□ □

मुल्लाअल्ली अब्बास

□

### "डॉ. स. ना. कुलकर्णी-गौरव"

वनस्पतींचा भक्त तयाची कीर्ती जा जनकर्णी
शून्यातुनि नवविश्व निर्मिती डॉक्टर श्री. कुलकर्णी ॥ध्रु०॥
हालअपेष्टा निंदा यातुनी पुढती हे गेलेले
वन-श्रीच्या त्या प्रेम-प्रभावे पूर्णपणे न्हालेले
दवबिंदूंचे वनांचित मोती, वृक्ष-लतांच्या पर्णी
शून्या० ॥१॥

डॉ. कुलकर्णी, छे !-यशस्वी ध्येयाचा इतिहास
सज्जनास हो सुमार्गदर्शक हा अमुचा विश्वास
आशीर्वाद देतात पहाते आभाळ, माता-धरणी
शून्या० ॥२॥

जन-सेवा, 'ईश-सेवा' समजुनि केली तयांनी सेवा
दिधला जनता-जनार्दनाला आरोग्यचा ठेवा
वनस्पतींचा भक्त तयाची कीर्ती जा जनकर्णी
शून्या० ॥३॥

# अनुक्रमणिका


| कवींचे नांव | पान नं. |
|---|---|
| " डॉ. स. ना. कुलकर्णी गौरव " (मुल्ला अल्ली अब्बास) | |
| १ श्री. बोराडे विनायक | १ |
| २. श्री. देशपांडे र. पां. (भागीरथीसुत) | २ |
| ३. श्री रजपूत विजयसिंग बा | ४ |
| ४. सौ विद्वांस मंगला | ७ |
| ५. श्री. थोरात नारायण ग. | ८ |
| ६. श्री. पोतदार मधु | ८ |
| ७. कु. नाईक राजलक्ष्मी | ९ |
| ८. सौ. केळकर चित्रा | १० |
| ९. श्री. बाठिया प्रकाश | ११ |
| १०. सौ. भालेराव प्राची | १२ |
| ११. श्री. कर्णिक अशोक | १२ |
| १२. श्री. वायचळ सु. उ. | १३ |
| १३. श्री. साळुंखे दत्ता | १४ |
| १४. श्री. दातार बनेश्वर वामन | १५ |
| १५. कु. कुंचूर शैलजा | १६ |
| १६. श्री. कुलकर्णी सुधीर | १८ |
| १७. श्री. भावसार डी. एस् | २१ |
| १८. श्री. पोतदार एच्. टी. | २३ |
| १९. श्री. ताराबादकर महेश | २४ |
| २०. सौ. शिंदे विजयालक्ष्मी | २५ |
| २१. श्री. गुळवणी गुरुनाथ | २६ |
| २२. श्री. करंदीकर नंदकुमार | २७ |
| २३. श्री जोशी प्रभाकर वामन | २९ |
| २४. श्री. कुलकर्णी लक्ष्मण विष्णु | ३० |
| २५. कु. खिरे माधुरी | ३१ |
| २६ कु. जोशी पद्मजा | ३१ |
| २७. श्री. पारधी रा. चि | ३३ |
| २८. श्री गडकरी शंकर राजाराम | ३४ |
| २९. श्री मोंढे मधुकर काशिनाथ | ३६ |
| ३०. श्री ओंबळे टी. आर. | ३८ |
| ३१. श्री. कोळपकर सु. ज | ३९ |
| ३२. सौ. धोत्रे सरोजिनी | ४२ |
| ३३. श्री. साने म. द. | ४३ |
| ३४. कु. सुंगी वर्षा | ४४ |
| ३५. कु. थत्ते संघ मित्रा | ४६ |
| ३६. श्री. कुलकर्णी सं. श्री. | ४७ |
| ३७. श्री. कोठारी सु. ज. | ४८ |
| ३८ श्री. पाठक म. रा. | ५० |
| ३९. सौ. कुलकर्णी मीनाक्षी | ५१ |
| ४०. कु. बुलबुले विनोदिनी | ५२ |
| ४१ श्री वैद्य श्रीराम वा. | ५५ |
| ४२. श्री. भोइटे बबन निवृत्ती | ५७ |
| ४३. श्री. शितोळे शि वि. | ५९ |
| ४४. श्री. तानवडे वि बा. | ६१ |
| ४५ श्री. श्यामकांत बाबुराव सातपुते | ६४ |
| ४६. सौ. सीता कुलकर्णी | ६७ |


—*—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२३६
दा. क्र. काव्य
२३३१
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

श्री. विनायक बोराडे

□

एक कविता

## १. तू एक स्वप्न माझे

तू एक स्वप्न माझे
रात्रीत रंगलेले
रव्योदयात परिही
नाहीच भंगलेले
माझीच तू प्रतिमा
विधिनेच रेखिलेली
छाया तुझ्या रुपाची
माझ्यात देखिलेली
माझ्या कणाकणाचे
माझ्या गुणागुणाचे
तव ठायी हे विरावे
श्रेष्ठत्व मीपणाचे
अद्वैत आज तू गे
राहोनिया दूरस्थ
ही स्नेह दीप्ती राहो
मम मानसी ज्वलंत

मुंबई

□ □

श्री. रघुनाथ पांडुरंग देशपांडे (भागिरथी सुत)

□



## २. ध्यास

स्वतःला शब्दात विसरून जाणे
हा कवितेचा ध्यास

स्वतःला कवितेत विसरून जाणे
हा कवीचा ध्यास

स्वतःला माणुसकीत विसरून जाणे
हा माणसाचा ध्यास

स्वतःला माणसात विसरून जाणे
हा देवाचा ध्यास

स्वतःला स्वतःत विसरून जाणे
हा आत्म्याचा ध्यास

स्वतःला आत्म्यात विसरून जाणे
हा परमात्म्याचा ध्यास

ज्याचा त्याचा ध्यास असतो
ध्यासाचा हव्यास असतो
यातच स्वतःला विसरून जाणे
हा प्रत्येकाचा ध्यास असतो

□ □

## ३. लय

हे हात कंकणांचे नादातच किणकिणती
हे पाय नूपुरांचे गंधातच झंकरती
हे नेत्र चंचलेचे दृष्टीच नाही ठरते
तनु हीच अंगनेची अमृतात हो नहाते
नादात गुंगवूनी गंधात धुंदविते
धुंदीत लुब्धवूनी रसिकांस मुग्ध करिते

□ □

## ४. हुतात्म्या प्रत

हुतात्म्या, तुज वन्दन करितो आम्ही भारतीय
देह सांडिला यज्ञ स्थंडिली आम्हा वंदनीय
देशाच्या स्वातंत्र्य रक्षणी करिसी बलिदान
मातृभूमिच्या अस्मीतेचा असशी अभिमान
बलिदानाने तुझ्याच होते राष्ट्र चिरंजीव
मरूनी राही अमर तेतचि तुझेच रे नाव
सार्थक झाले तुझेच जीवन आम्हा असे जाण
“ राष्ट्र कारणी ” जीवन अर्पूही आमुची आण

सरकारवाडा, करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

□ □

श्री. विजयसिंग बाळूसिंग रजपूत

□

तीन कविता

## ५. फुलारे

फुलारे...

सौंदर्याने आज तुझ्या–पाकळ्या पाकळ्या निखरल्या आहेत
मधु-सुद्धा आज तुझ्यात–काठोकाठ भरला आहे
धुंद गंधास्तव आज तुझ्या–चराचर अवघे बावरले आहे
पाहून तुलारे या स्थितीत–मलाच मी विसरलो आहे ?

फुलारे...

भोग लुटण्यासाठी तुझा–जिवा जिवात स्पर्धा आहे
मधू पिण्यासाठी तुझा–भ्रमरांची मोठी गर्दी आहे
केवळ गंध लुटण्यास्तव रे तुझा–वाऱ्याचे हे धोंगावणे आहे
विलास पाहता असारे तुझा–मी केविलवाणा झालो आहे

□ □

## ६. अरे तू....चालत रहा....

अरे तू चालत रहा त्या क्षितिज वर्तुळात
कदाचित कमळे फुलतील सुद्धा रखरखीत वाळवंटात !
आजचा काल भयानक असेल
डोक्यावरील सूर्य आग ओकीत असेल
पायाखालील वाळू तप्त निखारे बनेल
खोटे मृगजळ तुला भुलवीतही असेल

तरी तू चालत रहा...

तरी तू चालत रहा त्या ऽऽ क्षितिज वर्तुळात
कदाचित कमळे फुलतील सुद्धा खरखीत वाळवंटात
निर्भयतेत भयानकता ती गुदमरून मरेल
आग ओकणाऱ्या सूर्यास ढग झाकाळूनही टाकतील
उसळणाऱ्या कारंजांत निखारे शान्तही होतील
भुलविणाऱ्या मृगजळास चिरून प्रत्यक्ष कल्पतरूही अवतरेल
म्हणूनच तू चालत रहा...
म्हणूनच तू चालत रहा त्या क्षितिज वर्तुळात
कदाचित कमळे फुलतील सुद्धा खरखीत वाळवंटात

□ □

## ७. दिवस आणि रात्र

प्रत्येक दिवशी दिवस असतांना
काळाकुट्ट अंधार असतो
व माझ्यातील मी हरवलेला असतो ! हरवलेला असतो !!
हरवलेला असतो !!!

विनोदाच्या संगीताबरोबर
हास्याचे गीत गात असतो
आनंदाच्या कमलामधून
सौख्याचे मधू पीत असतो
सोबत्यांच्या पुष्प वनातील
समाधानी भ्रमर बनत असतो

हे सर्व ढोंग असते ! हे सर्व ढोंग असते ॥
कारण प्रत्येक दिवशी दिवस असतांना
काळ्या कुट्ट काळोखामध्ये
माझ्यातील 'मी' हरवलेला असतो ! हरवलेला असतो !!
हरवलेला असतो !!!
परन्तु-प्रत्येक रात्रीच्या प्रखर प्रकाशामध्ये
माझ्यातील ' मी ' मला सापडत असतो-
गांभिर्याच्या संगीताबरोबर
रडवे गीत गात असतो
आत्म मत्सराच्या करवंटीमधून
दुःखद जहर पीत असतो
भोवतालच्या पिशाच्यामधील
वेताळ मी बनत असतो
हे मात्र सर्व सत्य असते ! हे मात्र सर्व सत्य असते
कारण-प्रत्येक रात्रीच्या प्रखर प्रकाशामध्ये—
माझ्यातील ' मी ' मला सापडलेला असतो !
सापडलेला असतो !!
सापडलेला असतो !!!

न्यू पोलिस लाईन, खोली नं १०
बारामती, पुणे

□ □

सौ. मंगला विद्वांस

□ दोन कविता

## ८. स्मृती

अशाच एका संध्याकाळी नदीकिनारी बुरुजावरती
शुक्र चन्द्रमा क्षितिजावरती तूं अन् मी एकान्ती ॥१॥
बालपणाच्या कोषामधूनी तारुण्याच्या उंबरठ्यावरी
अबोल माझी अस्फुट प्रीती जडली होती तुझ्यावरी ॥२॥
कालौघाच्या स्मृतीत दडल्या त्या धुन्द किती आठवणी
बकूल सुमने सुगंध देती आजही माझ्या मनी ॥ ३ ॥
जगावेगळी प्रीत तुझी रे भृंगासम चंचल
न रुळलेल्या मार्गावरुनी जाण्याचा तव बोल ॥४ ॥
अंतरंगी भावनांचे चित्र मी रेखाटले
चित्रकार तू असुनी कुशलही नाही तुवा ते उमजले ॥५॥
कोमल हृदयावरी जाहला आघात कैसा साहूं ?
दैवगती ही माझी पुरती दोष कुणा देऊ ?॥ ६ ॥

## ९. साक्षात्कार

माझ्यात गुंतले मी, माझ्यात हरवले मी
ॐ काराच्या साक्षात्कारे जीवन मम बहरले ॥ माझ्यात
गुंतले मी ॥ धृ० ॥
फुलासारखे मन्मन माझे सुखदुःखाचे पेलील ओझे
संगीताच्या सप्त स्वरांनी जीवन मम फुलले ॥ १ ॥माझ्यात ..
शब्द-सृष्टीच्या गंगौघाने निसर्गाच्या सान्निध्याने
परमेशाच्या सौंदर्याने मन्मन हे नटले ॥ २ ॥माझ्यात ..
हरिर् ॐ हा मंत्र महान काळालाही करी आव्हान
तत्-सत्, तत्सत् हे भगवान, मन्मनी हे
स्फुरले ॥ ३ ॥ माझ्यात ...

'मनिषा', माणिक कॉलनी, चिंचवड, पुणे ३३

श्री. नारायण गजीराम थोरात

एक कविता

## १०. " तिथे टेकवितो माथा "

अहंभावा थारा नाही
उजळल्या दिशा दाही
क्षण सुशिल सत्याचा
तिथे टेक० ॥१॥

सुसंस्कारित मने
जशी फुलतात बने
नसे अन्यायाची क्षिति
॥ तिथे० ॥२॥

सहस्र रश्मिची माया
नसे कलहाची छाया
नीत उत्कर्षाची साथ
तिथे० ॥३॥

सर्व संपन्नचि आहे
जिथे ज्ञान गंगा वाहे
तीन गोमुटी लेकुरे
तिथे० ॥४॥

विहितगांव, नासिक रोड
जि. नासिक

श्री. मधु पोतदार

एक कविता

## ११. भूल

कुरळ बटेची मोहक वळणे भाळावरती दिसली ग
टपोर जास्वंदीची लाली ओठावरती हसली ग
शिरी माळली फुले तशी ती केसांतुनी परिमळली ग
काजळ काळ्या डोळ्यांची अन् भाषा मजला कळली ग
डौलदार नि संथ चाल ती सिंह कटीच झुलली ग
आरसपानी तरल ओढणी वक्षावरूनी ढळली ग
अधीर होऊनी, येता जाणीव स्पर्शातच हुळहुळली ग
अल्लड, अवखळ रूपास तुझिया प्रतिभा माझी भुलली ग

हिमगौरी, ब्लॉक नं. १
कर्वे रोड, एरंडवणे, पुणे ४

राजलक्ष्मी नाईक

□

एक कविता

## १२. पुढे काय ?

या रंगमंचावर
तुझ्या सहा सूत्रांनी
तू मला खेळवित आहेस
माझे सारे पदन्यास
केवळ तुझ्या हातात आहेत
तुझ्यावर विश्वास आहे
हे नृत्य चाललं आहे
तरी ही एक शंका
मनात सतत दाटत आहे
हे नृत्य संपल्यानंतर—
पायातलं बळ सरल्यानंतर
पुढे काय ?
दुसऱ्या मुद्रेसाठी उभं रहायचं
पुनः नवा शृंगार करून
की तुझ्याकडे धावत यायचं
सारा शृंगार उधळून देऊन ?

श्रीराम कुटी, गुरुवार पेठ,
माधवनगर, सांगली.

□ □

सौ. चित्रा रमेश केळकर दोन कविता

## १३. स्वप्नसृष्टी

एक स्वप्न स्वप्नात जागलेले
दोन मिटते डोळे त्यांत जागलेले
थकलेली काया अचेतन निजलेली
मनातील माया चेतनेत उरलेली
सुप्त हास्य कळी ओठात विलगलेली
मधुर स्वप्न सृष्टीत नकळत लाजलेली
उमलत्या पहाटेत हळूच दडलेली
जागत्या डोळयांतून हलकेच निसटलेली

## १४. मनाविना

गंध वाया श्वासा विना
चांदणे व्यर्थ रात्री विना
कोण हसतो कोण रडतो
रे मनाच्या भावनेविना ॥१॥
भावनांचे लेऊन लेणे
जो तो जगतो कायेने
कधी चालणे, कधी थांबणे
सांभाळून मनाचे खेळणे ॥२॥
मृत्यूत काया मनाच्या भिठी
संपेल सारे जग
म्हणोनि आलिंगनात आत्म्याच्या
सुटतात काया मनाच्या गाठी ॥३॥

४६५, शनवार पेठ,
पुणे ३०

प्रकाश एफ्. बाठीया

दोन कविता

□

## १५. चांदणं

पुनवेच चांदणं
माझ्या मनांत
लपलं
अन्
माझ्या कानाशी
कुजबुजलं
आला चंद्रमा
शोधायला
तर सांगू नका त्याला
मी इथं लपलोय
म्हणून

## १६. बोच

तूं दिलेल्या
रेशमी
जखमा
आसवांच्या
धाग्यांनी
शिवतांना
सुईची बोचही
आता
सहन होईल कारे

मुरलीधर भोईर हाऊस
भोईर कॉलनी
चिंचवड, पुणे ३३

□ □

सौ. प्राची अरुण भालेराव

एक कविता

## १७. पक्षी

ऊन कोवळे फुलाफुलावर
कोरीत पक्षी
मंद सुशीतल गंधित वायू
उठवी लहरी वसुधा नक्षी
व्हावे कोमल सुरेल पक्षी
सुर मारावा अंबर कुक्षी
अथवा बसुनि फांदीवरती
डुलत झुलत रहावे वृक्षी

२५५ गणेश पेठ, पुणे.

□ □

श्री. अशोक कर्णिक

कविता एक

## १८. ओळख

तुझी न माझी पहिली ओळख अबोलीला ज्ञात होती
एक उन्मादक आठवणीची कायमची खूण गाठ होती ॥
तुझ्या जास्वंदी ओठावर शहारला लाजेचा पक्षी
बावचळलेल्या नेत्रात दिसली एकटेपणाची चाहूल ॥
तुझ्या लाजऱ्या स्वरांत सप्तस्वरी तार होती
आणि तुझ्या हृदयांत होती फक्त मीलनाची यातना ॥

११३ स्नेहवर्धन सोसायटी,
सहकारनगर, पुणे ९.

□ □

सुरेश वायचळ ( कुर्डुवाडी )

एक कविता

□

## १९. गुन्हेगार

रेल्वे गाडी येता स्टेशनावरी
होते प्रवाशांची रेलचेल खालीवरी
घेऊन हातात खाद्य पदार्थ प्रवासी
ढकलून पोटांत मिटवतात भूक छोटीसी
तीच ती दिनवाणी अस्थिपंजर मुले लाचार
मागून भीक ह्या प्रवाशांना करतात बेजार
टाकताच हातातील उष्टा कागद
तुटून पडतात त्यावर भुकेल्या कुत्र्यागत
चाटून चाटून कागद करतात पूर्ववत
हेही मिटवतात क्रूर पोटाची भूक त्यावर
हीच ती लाचार दीनवाणी कुत्र्यासमान मुले
प्रेमाविना, आस्थेविना, बनतात पुढे गुन्हेगार
घेऊन तयांना जवळ, धनिक गोरे लोक
काम करवतात त्यांचेकडून काळे बिन धोख
करून ह्या भयानक नाटकास जबाबदार
आजचे हे पैशासाठी धावणारे तुम्ही आणि आम्ही
प्रेमाच्या समयी भूक मार खाते
त्यामुळे भुकेसाठी गुन्हेगारी प्रवृत्त होते.

पत्ता : 'शिवसदन' जवळ, कोटींचा बंगला, अक्कलकोट
जि. सोलापूर

□ □

श्री. दत्ता साळुंखे

एक कविता

[]

## २०. जीवन

मार्ग आक्रमिता
काल हा अतीत !
पथ सरता सरेना
अजूनहि अतृप्त ?

अजूनहि अतृप्त–
भाव विश्व मनोरे
भावना बांध अरे
दिक्काला बाधित ।।

दिक्काला बाधित
मना, तुझी हाव
कोण तुझा अभाव ?
अदृश्य–अतृप्त ?

अदृश्य दृश्य सुख
विचार कल्पनेत
तृप्ति जीवनांत
जीवा, जीवनामृत

१३८४ सणगर गल्ली, पंढरपूर, जि. सोलापूर.

□ □

कवी– बनेश्वर दातार

एक कविता

□

## २१. हातच्या कंकणाला आरसा कशाला

हाताच्या कंकणाला आरसा कशाला
उत्तम वीरास ढाल कशाला
जातिवन्त लेखकास पुस्तक कशाला
प्रतिभावन्त कवीस प्रसिद्धी कशाला
चित्र दिग्दर्शकास चित्र-मन्दिर कशाला
चित्रपट प्रेक्षकास चित्र-मन्दिर कशाला
एकाला साथी दुसरा
मग होई तो खरा
हातचे कंकणास
आरसा कशाला
विश्वास बसत नाही
म्हणून पहाण्याला

७६७ नवा सदाशिव, फडतरेवाडा.

□ □

शैलजा कुंचुर

दोन कविता

□

## २२. प्रतिक्षा

किती वाट पाहु तुझी
आहे पूर्ण मी तुझी
कंठ दाटला
बांध फुटला
मनीचा
किती वाट पाहु तुझी ।। १ ।।

तू माझा, मी तुझी
द्वये सुखे वरपु आयुभरी
लोचन मिटले
आंसू झरले
अनावरी
किती वाट पाहु तुझी ।।२।।

देवा मी भक्त तुझी
येते आठवण सदा तुझी
कळ उठली
तव नामाची
हृदयांतरी
किती वाट पाहु तुझी ।।३।।

□ □

## २३. एक पुरे

क्षण एक पुरे प्रेमाचा
तोच खरा भाग्याचा

किरण एक पुरे आशेचा
तोच खरा आनंदाचा

मन एक पुरे मनासारखेच
तेच खरे नशिबाचेच

पळ एक पुरे त्यागाचा
तोच खरा अभिमानाचा

नाम एक पुरे देवाचे
तेच खरे आनंदाचे

कर एक पुरे पाठिंब्याचा
तोच खरा समाधानाचा

शब्द एक पुरे धीराचा
तोच खरा मोलाचा

प्लॉट नं. ५९।६०, शनिवार पेठ, माधवनगर
जि. सांगली



□ □

श्री. सुधीर कुलकर्णी

□

## २४. महापुजेच्या वेळेस

देवाच्या महापुजेच्या वेळेसच
तो आली
म्हणाली–
"किती हा उशीर"
आवाज गोड, शब्द भोळे
नव्हे
प्रेमाचे गोळे
झाले ! आमचे दिपले डोळे
आठवले प्रेमाचे डोहाळे ॥ १ ॥
तिचा एकच नयन तीर
बस्स !
शिकार बन गये प्रेमवीर
कहने लगे–
मोहब्बत, इष्क, प्यार सजना
'तू दिवानी मैं दिवाना'
वाटले
महापूजा संपूच नये
डोळ्यापुढून ती जाऊच नये
तरीही पूजा संपली

दर्शनही घेतले
शरिराने मूर्तीचे
मनाने तिचे ॥ २ ॥

मूर्ती ती मूर्तीच राहिली
हृदयाची पूर्ति झालीच नाही
मूर्ति अभंग
दिलाच भंग
नाही समजलो प्रेमाचा रंग
म्हणालो प्रेमा तुझा रंग कसा ?

□ □

## २५. विरहाची रात्र

कंठितो या कुशीहून त्या कुशीवर
तव मूर्ति आठवितो, आळवितो मम स्वप्नी
स्वप्न कसले ? जिथे ना निद्रा
निद्रेविना स्वप्न
ना ते स्वप्न ना ती निद्रा
असतील जर ती स्वप्ने
तर ते – अवशेष
माझ्या हृदयाचे
भग्न प्रीतीचे—

□ □

## २६. गुलाब सडतोच आहे

एक राजवाडा
तोफ एक मुलुख मैदान
बेदरकार बेगम-एक अर्धा राजकुमार
अनंत हुजरे
त्यांत एक गुलाब - कोमेजलेला
उंच उंच भिंती
कारागृहाच्या
गजाआड अनंत रानफुले
डोलताहेत...
फुलताहेत...
एकाच किरणावर प्रकाशाच्या
बिचारा गुलाब
असूनही राजवाड्यात
नसूनही रानफुलांत
कोमेजतोच आहे
सडतोच आहे

१५९५ घोंगडे गल्ली, पंढरपूर

□ □

श्री. डी. एस. भावसार

□

दोन कविता

## २७. माझाच मी

माझाच मी आहे, नी मी माझा स्वतःचा
जगी नाती-गोती कोणी तरी कुणाचा
मी असतो वक्ता नी मन माझे श्रोता
गोंधळून जातो मी माझेच वक्तव्य ऐकता
कधी तनू भांडते मम मनाशी
होते मन नीत विजयी तनु-युद्धासी
जन वदती निजलग माझा माझा
परि विसरती आहे तो त्याचा
माझी मने माझ्याशीच, मीच त्या कलही साक्षी
भिन्न भिन्न भुवनी संपर्की त्याच्याशी
म्हणूनी मम तन, मन, नी धन
परमेश्वरा माझाच मी करतो समर्पण

□ □

## २८. प्रश्न उत्तर

जन्म नी मरण आहे कृत कर्म जाण
तस्मात तुज मनुजा न भयास कारण
जन्मूनी प्राण्या तूच मृत्यूस आमंत्रण
नी म्हणूनी मृत्यूस वाटे जन्म-निमंत्रण
जगी सत्कर्मी भरूनी उरावे
मरता मरणासी मृत्यू मारावे
जन्म-मृत्यू नाण्याची दोन शकले
वाटू दे बालक खेळी बाहुला बाहुले
जन्म, जात मरण, हे विश्वी महासत्र
मानवा हेच तुज मोक्षी महामंत्र
जन्म हे प्रश्नचिन्ह आहे उत्तराविना
'मरण' हे उत्तर मान्य असे प्रश्नाविना
नरा, यालाच बनवी विधानार्थक वाक्य
लाविशी भक्ती-ज्ञान-वैराग्यपणा तरीच शक्य

एच. ए. कॉलनी, ए ३२१
पिंपरी, पुणे १८.

□ □

डॉ. एच. टी. पोतदार

□

एक कविता

## २९. मागणे

बुद्धीची किनार – पत्नीच्या चातुर्याला
तिच्या आयुष्याला ओहोटी न दे ॥ १ ॥

पत्नीच्या सुखाला – सौभाग्य ते मिळो
आनंद तो खेळो मन-मंदिरात ॥ २ ॥

वसंतासवे येते – सौंदर्य वनाला
पत्नीच्या आयुळा – उतार न दे ॥ ३ ॥

गीतामृत तिच्या – मार्ग जीवनाला
सागर सुखाचा – तुडुंब भरो ॥ ४ ॥

सुराचे संगीत – चंद्राचे चांदणे
हर्षाचे कोंदणे – मिळो तिला ॥ ५ ॥

आयुष्य चंद्र तिचा – होओ पौर्णिमेचा
दिन तो भाग्याचा – दाखवी मज ॥ ६ ॥

तळेगाव दाभाडे, जि. पुणे.

□ □

श्री. महेश तारावादकर

□ एक कविता

# ३०. ज्योती

ज्योती
मला लावायची आहे
फक्त एकच ज्योती
ॐ ची ज्योती
अज्ञानाचा अंधःकार घालवण्यासाठी
ज्ञानाचा प्रकाश उजळण्यासाठी
सतत प्रयत्न हा एकच उपाय
नेईल मला त्या शिखरावर
विचारांचे इंधन जाळून
खाली राहील काय
ना देह ना विकार
केवळ सत्-चित् आनंद

८४६ अहिताग्नी राजवाडे रस्ता,
सदाशिव पेठ, पुणे ३०.

□ □

(स्थळ प्रत) ग्रंथालय ठाणे शाखा दा. क्र. २२३६ २३३७



सौ. विजयालक्ष्मी शिंदे

□ एक कविता

## ३१. नवयुग-संदेश

उजळुनि दीपक विज्ञानाचा, नष्ट करू तम अज्ञानाचा
स्वीकारूनि पथ या ध्येयाचा, मार्ग आक्रमू ज्ञानि
प्रगतिचा ॥ ध्रु० ॥

शास्त्र प्राण्यांचे, वनस्पतींचे
भूगोल, खगोल, नि रसायनाचे
धडे घेउनि अश्मीभूतांचे
सिद्धान्त शिकोनी उत्क्रान्तीचे
जीवसृष्टिचा, शोध घेऊया या विश्वाचा ॥ १ ॥

शत्रु आमुचे, रोग पिकांचे
अडविती मार्ग ते, हरित क्रान्तिचे
अस्त्र उगारूनि विज्ञानाचे
शस्त्र परजुनि औषधांचे
संहार करूयाया किडींचा नि बुरशींचा ॥ २ ॥

लक्ष्य आजचे, परग्रहांचे
चंद्र, शुक्र नि मंगळाचे
सज्ज करूनि अंतरिक्षयाने
घेऊनि वैज्ञानिक उपकरणे
ध्यास घेऊया गतिचा, प्रकाश वेगाचा ॥ ३ ॥

नव्या पिढीचा, तरूण आजचा
शोध घेतेस आदर्शाचा
जशी परंपरा संतांची
निर्मू तशीच शास्त्रज्ञांची
'विज्ञान जागृति' मंत्र असे हा नव्या युगाचा ॥ ४ ॥

५४७, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे ३०.

श्री. गुरुनाथ गुळवणी

□

एक कविता

## ३२ -चिरशान्ती-

याच नयनी याच अवनी
पाहे मी प्रवासी पथिक
शिवा भेटण्या गिरी चालले
मने होऊनी एक ॥ १ ॥
ओझे पाठी घेऊनी क्रमती
बिकट वाट पुढची
उरी दाटते अलोट प्रिती
अगाध शिवलिलेची ॥ २ ॥
अल्लड निर्झर झुळझुळती
मंजुळ गाणी पक्षी गाती
शिवलिंगाचे भजनी रंगती
ॐ काराला हृदयी जाणती ॥ ३ ॥
शिवप्रतिकाचे दर्शन घेता
दिव्यत्वाची येत प्रचिती
स्वार्थी लोभी या जगती
मनास मिळते चिरशान्ती ॥ ४ ॥

११८७।६९ घोले बिल्डिंग,
घोलेरोड, शिवाजीनगर, पुणे ५.

□ □

श्री. नन्दकुमार करन्दीकर

□

तीन कविता

## ३३. पवित्र प्रेमा

चंद्र नभीचा जणू सांगतो मजला दुःखान्तिका
जगती असते खऱ्या प्रितीची अशीच शोकांतिका ॥ ध्रु० ॥
कोमलतेची किंमत असते क्षणभंगूरातच
फुलांनाहि मरण येते दोन दिवसातच
प्रितीची ग्वाही देतसे पतंग मरणातुनि
कमलदलेही नाही सुटली सर्प वेटोळ्यातुनी
कल्पनेहूनी असे निराळी भयाण सत्यकथा ॥
अरुणाचा अरुणोदय व्हावा मन्मनीच्या क्षितीजावर
असे आस ही केव्हापासून, घडले काही और
करीन कशी बदनाम मी तिला, केले मी प्रेम
प्रेमास्तव सर्वस्व त्यागणे मानला मी धर्म
परन्तु मजला बन्द जगाच्या सर्व पायवाटा
वृक्षावरती वीज पडते, आणि वृक्ष भंगतो
ज्वलनातूनही प्रेमच दिसते प्रेमास्तव मरतो
शान्त पाण्यावरती उठावी अवचित वादळ लाट
हृदयावरती कधी न सोसवे हा वज्राघात
पवित्र प्रेमा, विजय शेवटी, कठोर वास्तवता

□ □

## ३४. दैवगती

एका देशी सूर्य उगवतो । दुसरीकडे अंधार
नशिबाचीही अशी रहाटी । शान्त कधी अंगार ॥ धृ० ॥
कुणाचे नकळत दैव उघडते माती घेता सोने होते
तेच दैव दुसऱ्या कुणाचे सर्वस्वही जाळिते
ज्या विसरावे तेच आठवते, आठवावे ते विसरणार ॥ १ ॥
काल होत्या मिटून पाकळ्या आज दिसती फुललेल्या कळ्या
नशिबी नसते काहीच्या हसणे मुकेपणातच जीवन सरते
जग रहाटी, कशी ही उलटी । कुणा कोण पुसणार ॥ २ ॥
तुडुंब भरूनी ही वाहे सरिता जीवन दायिनी म्हणून पूजिता
एके काळी तीच कधितरी खुडते जीवन मध्यावरती
रूसले कोणी, पुजिले कोणी । कुठे न विसावणार ॥ ३ ॥

□ □

## ३५. हासला ग हासला चंद्रमा

हासला ग हासला हा चंद्रमा नभात
वैशाली ग बाळ खेळे माझ्या अंगणात ॥ धृ० ॥
बोबड्या तिच्या बोलाने घरकुले हे अवघे सजले
उड्या मारी आनन्दाने मम बाल्य आठवले
जणू काहा बहरा आला, असे पारिजात ॥ १ ॥
खोड्याही भारी करिते रागावता खुदकन हसते
विसरून मग सर्वहि जाते बिलगूनिया तिज हृदयाते
आईऽऽ म्हणताच होतो कष्टांचा ग अन्त ॥ २ ॥
जन्माचे सार्थक माझ्या संगती ग राजू तुझ्या
आणखी मज काही नको जीवनात काही आता
रामाच्या ग प्रसादाने, सुखाची बरसात ॥ ३ ॥

१३१८ 'ब', कसबा, भक्ति-कुंज, पुणे ११.

श्री. प्रभाकर वामन जोशी

□ तीन कविता

## ३६. आत्महत्या

कराबी वाटते आत्महत्या द्यावा झोकून हवेत देह
उंच अशा डोंगर शिखरावरून ज्याच्या होतील चिंधड्या
पायथ्याच्या खडकावर प्रेत पडेल रक्ताच्या थारोळ्यात
आर्त किंकाळी फोडून फुटेल डोके, डोकावेल बाहेर
आतील मेंदू आणि क्षणात जातील प्राण निघून
होतील चिन्ता शान्त
दुःखे हरतील, निराशा क्लेश संपतील
मुक्त होईन सर्व सुखदुःखातून
पण प्राणोत्क्रमण झालेच नाहीतर
कंबरडे मोडून पडावे लागेल
घरातील कोपऱ्यात परावलंबी जीवन जगत
आणि पुनः पश्चात्ताप होईल अयशस्वी आत्मघातावर

□ □

## ३७. क्षण

वेडे होऊन भटकते मन शोधित प्रेमाचा निवारा
क्षणाक्षणाला मिळावा वाटतो तुझा प्रेमळ जिव्हाळा
पापणी उलविता दिसावे वाटते तुझे सोज्वळ सुन्दर रूप
पावलोपावली व्हावा वाटतो तुझा कोमल स्पर्श
रात्रंदिन होते आठवण तुझ्या गोड बोलांची
केव्हा येईल तो क्षण पुन्हा सर्व अनुभवण्यासी

□ □

## ३८. नियोजन

पहिल्यास घेतला स्वल्पविराम
दुसऱ्यास घेतला अर्धविराम
आणि तिसऱ्यास स्वेच्छेने
घेतला पूर्णविराम

३५१ द. कसबा, जतकर वाडा, सोलापूर
श्री. लक्ष्मण विष्णू कुलकर्णी एक कविता

□

## ३९. आज मितीला या घडीला

आज मितीला या घडीला कोण आहे जगतात माझ्या ?
भग्न वेडे स्वप्न माझे क्रन्दते विश्वात माझ्या !
उजाड जीवन भयाण सावल्या मनाची पुटे उकरत आहेत
आशेचे अंकुर आशेने पाण्याच्या फुटलेल्या पालवीला
जगवत आहेत
त्याला आश्रूंचा तळात फुटलेला पेटलेला वणवा विझवू पाहतोय
जळणारा सागर इंधन म्हणून तेच आसू पेटवू पाहतोय
आज मितीला... ?
भूतकाळातील आशेच्या गोबऱ्या-सावल्या
वर्तमानाच्या स्मशानात दडून बसल्यात
अन् भविष्याच्या चितेमागील सैतान कोवळ्या मनाला
निब्बर बनवतात
भयाण माळावर उगवता सूर्य फूल उमलवून एकदाच गेला
मग पसरलेल्या मिट्ट काळोखात स्वप्नांच्या चिता धडधडू
आज मितीला लागल्या
मावळत्या सूर्याची एक आठवण एकच झलक विश्वात आहे
अन् येणाऱ्या भ्रमराची वाट पहात सुकलेले फूल उल्हसित आहे

५२५/२ अ, नारायण पेठ, पुणे ३०

□ □

कुमारी माधुरी खिरे एक कविता

□

## ४०. स्मृती

अशाच एका स्थळी येई पूर्वी वेळोवेळी
बसत असू सायंकाळी निरखित असू त्या जळी
खडा टाकूनी त्या लहरी पाहात असू बरोबरी
कधी त्यात न पडला खणु जरी पडला तरी होई दंड
येई येथे आनंदी-आनंद पण आज सारे दुःख
कोण कोठला आला गेला आनंदीचा सूर्य निमाला
अशीच आज आले आहे एकटीच वेचाया स्मृती त्या
वाट पाहे खुळे मन येइलच पण कसला तो
येण्यासाठी तो गेलेलाच नसतो

२७४ शुक्रवार, पुणे २

□ □

कु. पद्मजा ल. जोशी दोन कविता

□

## ४१. आभाळ खंड

आभाळ शोधित गायिली
आषाढ दर्द गाणी—
अथांग धुंडित पाहिली
आभाळलेली विराणी
नभ झुंबरात चमकली
अंधार धुंद सौदामिनी
स्मरते तिचीच सावली
आभाळ खण्ड राहुनी

□ □

□

## ४२. 'दरी'

अश्वत्थाम्याची अमन्ती वाट कधीच संपलीय
समोर उंच उंच डोंगर काळाकाभिन्न

शिखर कसं शोधावं उमजत नाही य
दूर दूर पसरलेलं आकाश

साद घातलीय् प्रत्युत्तर मिळत नाही
भटकणाऱ्या भुस्तफिराला प्रतिसाद कधी
मिळायचाच नसतो
पायवाट सरकतेय् पावलं कुठं नेताहेत -

कदाचित पुढं खोल दरी—आवर्तन संपवणारी

३१/४५४ लोकमान्यनगर, पुणे ३०.

□ □

श्री. राजाराम पारधी

□

दोन कविता

## ४३. धरामाई

कधी येईन मी खाली । जीव माझा आसावला
धरा माईच्या कुशीत । थेंब थेंब विसावला
मायलेकरांची भेट । किती दिवसांत झाली
प्रेमपुरात धरणी । उभी न्हाऊन निघाली
कुणा कुणा सांगू बाई । माझा बाळ हो भेटला
झाला आनंद म्हणूनी । तिने सुगंध वाटला
बाळ इवला इवला । क्षणातच होई मोठा
मांडीवरी न खळता । धुंडाळितो चारी वाटा
नको वाजवू रे पाय । झोप मोडेल बाळाची
अवखळ तू गे बाई । आई सांगते वाऱ्याशी
आला आला हो पाऊस । सारा शिवार हर्षला
खेळे लपूनी उन्हात । नदी, ओढ्यात डुंबला
झाली भेटुनिया तृप्त । साज शृंगारे नटली
धरामाईनं साऱ्यांची । ओटी मोत्याने भरली

□ □

## ४४. " कृपादृष्टी "

जन्म देऊनीया काय तू दिधले
संसाराचे ओझे । वहावया ? ॥ १ ॥
सकाळी उठोनि तुझाच जल्लोष
तरी माझी आस । न फळा येई ॥ २ ॥
दयाळू दीनांचा असूनी का देवा
मजकडे ऐसा । काना डोळा ॥ ३ ॥
ज्याशी नाही धन त्याशी पुत्रभार
धनिक ठेविले । निपुत्रिक ॥ ४ ॥
दुजे नको काही, नाही आणि आस
पोटासाठी तरी । देई घास ॥ ५ ॥
दीनांशी तारावे आले तुझ्या मना
कृपा दृष्टी टाकी । एक देवा ॥ ६ ॥

सु. पो. – मलठण, ता. शिरूर, जि पुणे.

□ □

श्री. शंकर गडकरी

□

दोन कविता

## ४५. व्यथा

जाळणाऱ्या व्यथांना
 शाप जाळण्याचा
भावनांच्या आहुती
 कधी न संपण्याचा... ।
होऊन जाऊ दे
 राख साऱ्या आशेची

निष्प्राण मी झाल्यावर
खंत कसली वेदनेची
माहीत आहे मला...।
व्यथा ह्या चिरंजीवी
हवी कशाला आशा
छे! ती तर मायावी।

□ □

## ४६. आधार

कृति हवी म्हणून
विकृती वाढवू नका
धुंदी वाढवितांना
धुंध होऊ नका।
अंधाराची वलये पुसतां
धुक्यात विरून जाऊ नका
वर्तमान जगतानाहि
भूतकाळ विसरू नका।
भविष्याचे इमले बांधा
स्वप्नीय गुंग होऊ नका
आकाशाला कवेत घेता
आधाराला विसरू नका।

२२२९ मड्डी गल्ली, संकेश्वर, बेळगाव.

□ □

श्री. मधुकर काशिनाथ मोंढे

□ दोन कविता

## ४७. ज्ञानयाची ज्योत

चालली पालखी आज ज्ञानियाची
वाट ती सोपी पंढरीची ॥ १ ॥

असंख्य वारकरी मागे पुढे होती
नामानंदी विठ्ठलाच्या डुंबोनिया जाती ॥ २ ॥

टाळ मृदुंगाचा नाद होतो नामाचा गजर
ज्ञानियाची ही ज्योत चाले ज्ञानदीप उजळीता ॥ ३ ॥

कीर्तने नी प्रवचने अवघे ज्ञानाचे भांडार
सोपान आत्मबोधाचा मोक्षाचा आधार ॥ ४ ॥

ज्ञानोबा ते वारकरी नेमधर्म त्यांनी केला
वारस त्यांचे आम्ही चाललो पंढरीला ॥ ५ ॥

विठोबा – रखुमाई नाम ते पवित्र
जन्मजन्मांतरीचे पाप फिटे आपोआप ॥ ६ ॥

आत्म तत्त्वीं लीन झाला वारकरी तोचि भला
मोक्षाची कवाडे उघडितो तुज्याला ॥ ७ ॥

□ □

कै. चिंतामण त्र्यंबक खानोलकर यांचे स्मृतीस—

□

## ४८. चिन्तामणी

झेपाउनि उंच गगनी
खुडलीस पुष्पें नक्षत्रांची
लाभले देणे ईश्वराचे
फुटली पाषाण पालवी ॥ १ ॥
नांव तुझे चिन्तामणी
ठेवले मातापित्यांनी
काय त्यांना कळली होती ॥ २ ॥
पाहिले तूं ‘ अगोचरा ’
जाहला साहित्य चिन्तामणी
देउनि अक्षर नौका
गेला तूं पैलतिरी ॥ ३ ॥
कीं कालश्री तूं एक
वेणा दिधल्या अपार
दिव्य अपत्या जन्म देउनि
चिरनिद्रित झालीस तू ॥ ४ ॥
लाडका तूं ईश्वराचा
तेणे प्रतिभा लेणे चढविले
आम्ही पामरे काय द्यावे
केवळ स्मृतीचे लेणें ॥ ५ ॥

मोशी, हवेली; पुणें.

□ □

श्री. ओंबळे टी. आर.

□

एक कविता

## ४९. जीवन–ज्योत

माळावरती वाढतो
जसा  निवडूंग काटेरी
तसा मीही पोसावलो
कुटुंबात दरि दरी ॥ १ ॥
देखिले ना भोगिले मी
सुख कधी धनिकांचे
पाहिले मी भोगिले मी
दु:ख दु:खी मानवाचे ॥२॥
घाम गाळून फोडला
काळा कातळ खडीचा
कष्ट सारे उपसले
घेण्या प्रसाद विद्येचा ॥३॥

सागरात जीवनाच्या
पोहता लाटांनी मारले
जाता जीवनाच्या मार्गे
काट्याकुट्यांनी घेरले ॥४॥
झंझावाती वादळात
ना मी हललो खिललो
वीजा मेघांचे आवाजे
एक शब्द ना बोललो ॥५॥
देवपण येण्यासाठी
घाव सोसले टाकीचे
गीत गात मी राहिलो
माझ्या नव जीवनाचे ॥६॥

श्री वेल्हेश्वर विद्यालय, वेल्हे,
ता. जुन्नर, जि. पुणे.

□ □

सुभाष ज. कोळपकर

□

# ५०. अन्त

तीन कविता

विचारात आहे माझे चिन्तन
चिन्तनातच आहे माझे दुःख
दुःखातच आहे माझे सुख
सुखातच आहे माझे कार्य ॥ १ ॥
कार्यातच आहे माझे ध्येय
ध्येयातच आहे माझे साफल्य
साफल्यातच आहे माझे जीवन
जीवनातच आहे माझा राम ॥ २ ॥
रामातच आहे माझा मानव
मानवातच आहे माझी मानवता
मानवतेतच आहे माझे प्रेम
प्रेमातच आहे माझा विरह ॥ ३ ॥
विरहातच आहे माझे मिलन
मिलनातच आहे माझा जन्म
जन्मातच आहे माझा मृत्यु
मृत्यूतच आहे माझा आत्मा ॥ ४ ॥
आत्म्यातच आहे माझा परमात्मा
परमात्म्यातच आहे माझी अमरता
अमरतेतच आहे माझा अनन्त
अनन्तातच आहे माझा अन्त ॥ ५ ॥

□ □

## ५१. विरक्तीच्या मार्गावर

भोग माझ्या नशिबाचे भोगलेच पाहिजेत मला
परंतु नाही मी योगी-ते सहन करण्याला
म्हणून म्हणतो देवा योगी बनव मला
शक्ती दे मला हे सर्वस्व अर्पिण्याला ।। १ ।।

निर्विकार मनाने कार्य करण्याला
कार्यरत होऊ दे हा देह खर्चिण्याला
जीवनाचे माझ्या सार्थक करण्याला
शक्ती दे मला हे सर्वस्व अर्पिण्याला ।। २ ।।

आजवरी जरी मी नाही केली सेवा
कळते मला परन्तु विलंब झाला खरा
ध्येय माझे विसरूनही गेलो खरा
शक्ती दे मला हे सर्वस्व अर्पिण्याला ।। ३ ।।

या मोहमय प्रपंचात शक्तीहीन झालो
संदेश मनाला मिळता मी कार्यरत झालो
विरक्तीच्या मार्गाने पुनः चाललो
शक्ती दे मला हे सर्वस्व अर्पिण्याला ।। ४ ।।

□ □

## ५२. भीष्म-प्रतिज्ञा

हा मोह ही माया हा लोभ
खरोखर प्रबळ अशी आहेत
साधे काम नाही
सर्वस्वाचा त्याग करणे
विरक्त मनाचा विरळा

असा एखादाच असतो रामदास
नव्हे धर्माची चौकट बदलणारा
क्षत्रीय धर्म पाळणारा
देवव्रत !
तोच खरा भीष्म

ज्याने राज्यलक्ष्मीबरोबर
स्त्रीसुख सुद्धा लाथाडले
भीष्म-प्रतिज्ञा
सत्याचरण करून

तळेगाव ढमढेरे, शिरूर, पुणे.

□ □

सौ. सरोजिनी विष्णू धोत्रे

□

## ५३. याचना

जिवाच्या जिवलगा, दिलाच्या दिलवरा
साथ दे तू, साथ दे ।
मम हृदयीच्या कोंदणी मूर्ति तुझी राहू दे ।
आठवती मज बोल तव ते चांदण्या रात्रीतले ।
स्मरते मज काव्य तव ते मम जीवनी तू गायिले ।
गेलासी जरी दूर देशी परी स्वप्नी तुज मी पाहते ।
करशील का सत्य स्वप्न ते मी नयनी जे देखिले ।
जायचे तुज दूर देशी तर वचने दिली कां तू मला ।
गोड थापा देऊनी कां तू भुलविलेसरे मला ।
येऊनी क्षणी, भेटुनी त्वरे घेऊनी जा रे मज दूर देशी ।
देवासी प्रार्थिते सख्या तव हृदयाची मी दासी ।

एस. टी. कॉलनी खोली नं. ६
सातारा स्टॅंडजवळ, सातारा कॅंप

□ □

श्री. महादेव द. साने

□

## ५४. व्यथा

कृष्णा सांग व्यथा ही खुळ्या जना
घडीभराचा खेळ संपला
विरहाने हा डाव रंगला
अज्ञ जनांनी अनर्थ केला
अदर्श प्रेमा कलंक दिधला......
राधेचे रे विकृत दर्शन
भक्ति सुधेचे विचित्र चित्रण
मनिचे राही मनि आक्रन्दन
उपहासे मज हसतील स्वजन......
लौकिक स्वार्था तुच्छ लेखले
दिव्यत्वातचि विलीन जाहले
अलौकिकाला जाउनि भिडले
'विषय वासना' दूर सारिले......
बाळ स्वरूपे मोहुनि गेले
भक्ति-दुधाचे घडे वाहिले
मोक्षाचे मज द्वार गवसले
जीवा शिवाचे मीलन झाले......

४२० सोमवार कऱ्हाड, जि. सातारा

□ □

कुमारी वर्षा भुंगी

दोन कविता

□

## ५५. जायचे आहे तर जा

जायचे आहे तर जा...... जायचे आहे तर जा,
पण......
प्रेमाची बरसात करून जा जायचे आहे तर जा
पण......
स्मृतिची शिदोरी ठेवून जा जायचे आहे तर जा
पण......
कटू सत्याचे जहर पाजून जा जायचे आहे तर जा
पण......
प्रीतीचे संजीवन घेऊन जा जायचे आहे तर जा
पण......
मला पूर्ण विसरून जा जायचे आहे तर जा
पण......
दुःख सारे मला ठेवून जा जायचे आहे तर जा
जायचे आहे तर जा

□ □

□

## ५६. शोध–सुनित

दुर दुर अहो खूपच दुर
मला आपली उगाच हुरहुर
शोध शोधून सापडणार नाही
पायपीट ही संपणारच नाही
धाव धावेन त्या पाठी मी
शेवटी कोलमडून पडेन मी
नेत्र थकतील.बघून बघून
गात्रे विसावतील थकून थकून
मी धावे सुखाच्या मृगजळामागे
दुःखे पाठ पुरवतील मागे मागे
शोधले तरी ते मिळणारच नाही
नशिबी नाही ते गवसणारच नाही
अरे अरे अरे मना शोक आवर सारा
आशेत जग, फुलेल कधी तरी फुलोरा

४४०, शनिवार, पुणे ३०

□ □

कु. संघ मित्रा थत्ते

एक कविता

□

## ५७. मळभ

काय करावं कळत नाही सुचत नाही काही सुद्धा
वातावरण असं ढगाळ मनावर दाटलेल्या मळभासारखं
मनावरचे विचारांचे...भवितव्याच्या विचारांचे मळभ
दूर केव्हां होईल याची वाट पहात
रहायचं असतं गुदमरत प्राण जात असला तरी
ओरडायचं नाही, आकांत नाही, तोंडातून ब्रही
काढायचा नाही
भवितव्य अंधारलेलं दिसत असूनही
गुदमरण कधीच संपणार नाही हे कळूनही
तोंडाला कुलूप घालायचं विचाराचं
त्याला सील करायचं विचारांनीच
नि अशा अवस्थेतच,
मळभ दूर न होता सूर्यप्रकाश न पहाताच
या जीवनाची अखेर करायची

४६४, नारायण पेठ, पुणे ३०

□ □

श्री. संजीव श्रीराम कुलकर्णी

एक कविता

## ५८. नील मोती

रूपाच्या तव सरोवरात
नयनांचे दोन शिंपले
तयातील नील मोती
पाहुन मज का हसले ?
खजिन्यात असती अगणित मोती
तुज सम नाही हिरा कोठे
नभात चमकती अगणित तारे
तुजसम नाही चंद्र कोठे,
शोधू मी तुला कसा
धरतीच्या या सागरात
रूपाच्या तव सरोवरात...
उमलतील बनात असंख्य फुले
तुजसम नाही गुलाब कोठे
विश्वात यौवनाची बहार फुले
तुजसम नाही यौवना कोठे,
विसरू मी तुला कसा
अश्रूंत सरते सारी रात
रूपाच्या तव सरोवरात

५३५, सदाशिव पुणे ३०.

□ □

श्री. सुकुमार जयकुमार कोठारी

□ तीन कविता

## ५९. असंच जीवन जगायचं असतं

पंख असून फडफडायचं असतं
एकमेकास आपण जगवायचं असतं
एकमेकास आपण फसवायचं नसतं
असंच जीवन जगायचं असतं...
पदर आड कुणाच्या तरी राहायचं असतं
आशेवर कशाच्या तरी जगायचं असतं
आपलं म्हणून सर्व वहायचं असतं
तिथे पेटलेल्या विस्तवाशी खेळायचं असतं
असंच जीवन जगायचं असतं...
सुख-दुःख हे पण गिळायचं असतं
संकटाच्या नावेत बसायचं असतं
मरत नाही म्हणून जगायचं असतं
शेवटी आश्रूच्या धारेत न्हायचं असतं
अन्, असंच जीवन जगायचं असतं...

## ६०. सुहागरात

सुगंधाच्या या सुवासात
हृदयाच्या या गाभाऱ्यांत
प्रीतीच्या या आगरात
फुललो आहे मी या नगरात
बसलो आहे मी या सदरात
येईन मी प्रीत सागरात
भेटेन तुज एक रात
असेल ती सुहाग रात

## ६१. संगत

कोरड्या या रात्रीला तुझी ती संगत दे
मुक्या या प्रीतीला तुझा तो आवाज दे
झाडा झुडपा संग प्रीत ही उमजू दे
हृदया हृदयातून हृदय हे ओरडू दे
तडफलेल्या मनाची तडफ तू ओळखून घे
आतुरलेल्या हृदयाची थाप तू जाणून घे
रुसरुसलेल्या मनाची मान आता डोलवू दे
धुसफुसलेल्या जीवनात हे जीव आता जगू दे
माझ्या हाता संग तुझा हात हातात आता दे
सात जन्मावरील सौभाग्य तू मागून घे

बारामती, जि. पुणे.

□ □

श्री. महादेव रामदास पाठक

□ एक कविता

## ६२. माता-महती

माया ममता गीत गाई
आईविना थोर जगी नाही ॥ धृ० ॥
मंगलतेची खाण ती
उन्मादाची प्रेरक ती
चुकल्या चिमण्या 'दीप' ती
तिच्याविना दुजा शिल्पकार नाही
मंगलतेच्या मनात राई
वात्सल्याची सदा सराई
जगात खुलवी रानजाई
'आईऽऽ' वदली गाऊन दिशा दाही
निरीच्छ निर्गुण स्वच्छंदेने
वेल वाढवी बालपुष्प उन्मादाने
मृदुल, सुन्दर, सुवास, वदने-
आठवणींची दिगंतर दुथडी भरून वाही
बाळा रुससी श्रावणसरी
रागात प्रेमझरे भरून उरी
क्षणाक्षणाला बदलतेस खरी
आभास, सर्व साक्ष तुझी जीवनग्वाही
चंदनासम तू झिजली
स्वर्गपुरीची शोभा दिधली
करस्पर्शे मम काया फुलली
गुण गावया शब्दवेली सुकली
तरी सुवास उरला स्मृतिसवे या देही

मु. पो. बोरी, ता. इंदापूर, जि. पुणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२२३६
दा. क्र. काव्य
२३३९



□

## ६३. आक्रीत

कारभारी आक्रीत सांगत्ये तुमाला
नांगरधारी किसान दौडत आला ॥ धृ० ॥

नारायणानं दिला प्रकाश
सोन्याचा दिन हो आला झकास
बांधूया तोरण घरादाराला ॥ नांगर ॥ १ ॥

गांधीबाबाच्या आशीर्वादानं
पुढारी देईल लोकशिक्षण
मिळेल चाकरी-भाकर सर्वाला ॥ नांगर ॥ २ ॥

जगाच्या घालुन हात हातात
लोकशाही वाढविल पत इभ्रत
चढवून साज-सत्य अहिंसेला ॥ नांगर ॥ ३ ॥

लोकशाहीचं आपल सरकार
मोप देईल बिना तकरार
घालूया औक्ष आख्या जनतेला ॥ नांगर ॥ ४ ॥

मतलबाचा भोग सोडूनशान
जनता उजुन करीन कल्याण
होईल कनवाळू गोर गरिबाला ॥ नांगर ॥ ५ ॥

किम्मत आता तुमच्या घामाला
बन्धु भगिनी लागू कामाला
सक्तीची भक्ती आता नाही कुणाला ॥ नांगर ॥६॥

धरणीवरती आमची माया रं
राबंराबती बापे बाया रं
पोरं बी आमची गेली पलटनीला ॥ नांगर ॥ ७ ॥
आनंद झाला सर्व्या जगाला
आरंभ केला नव्या युगाला
भलं गडी दादा आता भलरी बोला
नांगरधारी किसान दौडत आला

५०० । ६ शनिवार, विश्राम कुटी, पुणे ३०

□ □

कु. विनोदिनी बुलबुले — तीन कविता

□

## ६४. मृत्यूची किंमत

दिवस रात्रीच्या मांडीवर
  सारे जग खेळत असते
जगरहाटीच्या चक्रव्यूहात
  नियतिला दान देऊन जगत असते
जगता जगता काळ
  खेळत असतो लपंडाव
अमर सागरी नेऊन सोडणाऱ्या
  मृत्यूमातेच्या पावित्र्याचा आहे कोणा ठाव
जिवंतपणी मरणाचे जिणं जगणारा
  म्हणती मृत्यु आहे कठोर
मृत्यू गंगेलाच साथ देऊन सांग
  मृत्यू जगात नसता स्नेह नांदेल का तरी

ओंजळभर

□ □

## ६५. आयुष्य आणि नियती

आयुष्य म्हणजे रेल्वेगाडी
नियतिच्या एंजिनाने चढून जायची गड्डी
आयुष्य म्हणजे जंगल घन
नियतिनं दाखविलंय एकल्याचं एकलेपण
आयुष्य म्हणजे असंख्य आभूषणे
नियतिन फासलय जन्ममरणाचे कपाळी लेणे
आयुष्य म्हणजे गोड ठसे
नियतिच्या हेराचे सभोवती फासे
आयुष्य म्हणजे शुक्राची चांदणी
नियतिच्या मांडीवर बसून गावी गोड गाणी
तसे पाहता आयुष्य म्हणजे नियतिनेच निर्मिलेला गोळा
नियतिच करीत असते आयुष्याचा ताळा
आयुष्य-नियति दोघींचाही मान
टेकविती माथा अश्राप संतान

□ □

## ६६. अजब ही करणी

प्रभु कृपेच्या पसाऱ्याने मन होते वेडे
सांग सांगरे देवा कां लपविसी माझ्यापासूनि कोडे ।। धृ०।।
खळखळणाऱ्या सागरी
मौक्तिक शिंपे वास करी
उदास मना काढ तुझी देई पथारी
तूच भरलेस का ? कधी ? केव्हा ? हे पाण्याचे घडे ।। १ ।।

चंद्र आणि दिनकर
कामात नसे मागे पुढे पळभर
युगायुगाचा सोपविला भार
तुझ्या राजेपणास्तव, द्वारपालासम यांना केलेस का तूच खडे ।।२।।

घन मेघातुनी टिपे जलसरी
शुष्क वसुधेला मुदित करी
पानोपानी नवा तजेला भरी
सृष्टी साठी फुंकिलेस कोण्या समयी हिरव्या भस्माचे पुडे ।।३।।

समीर धावे पुढे पुढे
स्थितप्रज्ञ डोंगरकडे
घटिका गाते पाढेच पाढे
तू तुझ्यापणानेच अवघ्या चराचराला केलेस वेडे ।। ४ ।।

बीमधून फुले फुलती
फळे तयाची मधुर किती
बाल, यौवन वृद्धाचि ही स्थिती
धन्यता वाटे मनी मजला तुझ्या या करणीपुढे ।। ४ ।।

या तुझ्या अद्भुत कार्यांचे
अमर अशा बहुरूप्याचे
सृष्टीच्या आश्चर्य जालाचे
तूच दाव मजला एकवार । अद्भुत राज्याचे सोडवून कोडे
निसर्गातील कण कण गाती ती । घुमू दे माझ्या कानी
तुझे पवाडे ।। ५ ।।

१६४ गुरुवार, पुणे २.

□ □

[]

## ६७. थोर कला

अरे कशाला तूं आकांत तांडव करतोस ?
तुझ्या हातांत काय आहे ।
निमुटपणे सर्व सहन करणे
येवढेच तुझ्या हातांत आहे ।
बघ डोळे उघडून वेडया
सभोवार जगाकडे
जागरूक राहू नकोस गड्या
झोंपाळूपणांत आगळे स्वप्न आहे ।
निमूटपणे सहन कर तसे करण्यांत सुद्धा
खरे खुरे शहाणपण आहे
चिडूं नको रडू नको
होईल त्याची सवय तुला
अरे 'दगड', 'वीष' दुःख सुद्धा
पचविण्यात आहे थोर कला

□ □

## ६८. मानवतेचा आचार

जे जगाला जमलं नाही
ते करून दाखवलं आम्ही
जे जगाला समजलं नाही
ते केव्हाच उमगलो आम्ही
आम्ही काय म्हणतो ते
कुणी ऐकलंच नाही
अन् ऐकलं तरी त्यानी
मुळी तिकडे लक्षच दिलं नाही
मानवतेंच्या घोषणा
जग करतंय आज
प्रत्यक्षांत मानवता
भारताने दाखविली आज

□ □

## ६९. कधी कधी

क्षणांत जातो विसरून सारे
क्षणांत येती स्मृती जुन्या
हिंदोळ्यासम मानस झुलते
द्रवती कधी कधी नयन पापण्या

३५६, नारायण पेठ, पुणें ३०

□ □

श्री. बबन निवृत्ति भोईटे बन्याबापू दोन कविता

□

## ७०. जग म्हणजे काय ?

बालपणी मनी विचार करी, हे जग म्हणजे काय ?
मोठा झालो आणि अर्थ उमगला, जग म्हणजे काय ?
जग हे बन्दी शाळा, हे जग मानवाचा आरसा
पहातां त्या आरशामध्ये, ज्ञान होते मार्ग आक्रमावा कसा ?
मीही पाहिलेल्या आरशामध्ये, आणि पाणी आले नयनी
जीवनांतल्या त्या क्षणांची करितो, मी हृदयांत टिपणी
सुखदुःखांची पाने लिहितो, करून मनाची लेखणी ।। १ ।।
जीवनाचा हा वाटसरू, अर्ध्या वाटेवरी थांबला
जगाच्या आरशांत दिसले, थांबला तो संपला
अर्ध्या वाटेवरून मी हाक कितीदां मारिली
चुकलो आहे वाट, मला न्या कोणी तरी बरोबर
हांकेला प्रतिसाद ना मिळाली, तेव्हां हे गाणे लिहिले मनी
जीवनांतल्या त्या क्षणांची करतो, मी हृदयांत टिपणी,
सुखदुःखाची पाने लिहितो, करून मनाची लेखणी ।। २ ।।
हांक हृदयी विवरली, भवितव्य दूर राहिले
आजिंठा लेण्यासमान, हृदय माझे कोरिले
मानवा समान मानव हा, मानवांत मोडेना,
झाडे लावून दमला, पण फळ त्याला मिळेना
जीवनाशी लग्न सोहळा, अन् दुःखे मेहुणा, मेहुणी
जीवनांतल्या त्या क्षणांची करितो, मी हृदयात टिपणी
सुख दुःखाची पाने लिहितो, करून मनाची लेखणी ।। ३ ।।

□ □

## ७१. माझ्या मयतीचे सामान

कोणी माझे इमान जाणून घ्या
नाही तर माझ्या मयतीचे सामान घेऊन या
मला कोणीही आपला नाही म्हटले
म्हणून मी आपल्याला आज म्हटले
मला कोणी आपलासा करून घ्या ।। नाही तर...।।१।।
जीवनांत राहिलो मी एकलकोंडा
म्हणून फडकवू शकेना भवितव्याचा झेंडा
कोणी माझ्या भवितव्याचा झेंडा घेऊन या
।। नाहीतर ... ।। २ ।।
स्वप्नात मारला मी गगनात फेरफटका
बनलो चंद्र मी अन् होत्या भोवती तारका
फक्त एका तारकेला माझ्यासाठी बोलावून घ्या
।। नाहीतर...।। ३ ।।
पडला माझा देह होऊन निर्जीव
गेला हो जिवाला सोडून शिव
कोणी माझ्या जिवासाठी शिवाला घेऊन या
।। नाहीतर... ।। ४ ।।

३५९ शिवाजीनगर, पुणे ५

□ □

श्री. शिवाजी विठ्ठलराव शितोळे

□

एक कविता

( जी. शिव-मकरंद )

## ७२. दाव मला पंढरी

तुझ्या नामाचा छंद लागला गातो हरी हरी
मुखी गातो हरी हरी
विठ्ठला दाव तुझी पंढरी,
देवा दाव मला पंढरी ॥ धृ० ॥

भोळ्या भक्तासी तूंच तारिले ।
तुकयासी वैकुंठी नेले
लाज राखण्यासाठी तारीली गाथा पाण्यावरी ॥ दाव० ॥ १ ॥

भजनामध्ये तल्लीन झाला ।
मिरेसंगे विष प्याला
जनाबाईला दळू लागला ।
गातो ओव्या जात्यावरी ॥ दाव० ॥ २ ॥

दामाजीची लुटली कोठी ।
चोखोबाचे गळ्यात कंठी
चिखलामध्यें बाळ तुडवूनी ।
रांधिली मडकी चाकावरी ॥ दाव० ॥ ३ ॥

चांगदेवाचा गर्व हरविला ।
भिंतीसंगे तूच चालला

रेड्या तोंडी वेद वदवूनी ।
लिहिली ज्ञानेश्वरी ॥ दाव० ॥ ४ ॥

सावताची बाग रक्षिली ।
कबिरा घरची शेली विणिली
सोन्याचे दागिने घडविले ।
नरहरीच्या घरी ॥ दाव० ॥ ५ ॥

नामयाचा नैवेद्य खादला ।
काशीचे तू पाणी प्याला
पुंडलिकाची भक्ति पाहाण्या ।
धावसी भक्ता घरी ॥ दाव० ॥ ६ ॥

नामदेवे रचिला पाया ।
एकनाथ घडवी काया
नामा हाती रंग देऊनी ।
ठेवी तुका कळस मंदिरी ॥ दाव० ॥ ७ ॥

४७ हिरामण फुगे चाळ कासारवाडी, नासिक फाटा,
पिंपरी, पुणे १८

□ □

श्री. विष्णुपंत वा. तानवडे ( शिवदास ) तीन कविता
( सत्यभामातनय )

□

## ७३. सुख भोगूं ते खरेखुरे !

स्वातंत्र्याची मीठ-भाकरी, खाऊ सारे प्रेमाने
भारत भूचा करू उद्धार, एकी करुनी जोमाने ।। १ ।।
बेकीला त्या मिळता थारा पारतंत्र्य ते डोकावे
कशास करता सत्ता स्पर्धा, परमत कांहीं ऐकावे ।। २ ।।
चाळिस कोटी बंधू-भगिनी, स्वातंत्र्याच्या कामांत
खपले होते स्वराज्य घ्याया, क्रान्तिच्या संग्रामात ।। ३ ।।
गृहकलहाला मिळता थारा, एकी कैशी नांदेल ?
द्वेष मत्सरा चिकटुन बसता, पारतंत्र्य ते येईल ।। ४ ।।
गृहकलहाने प्रभू राम तो वनवासाते धाडियला
पुत्रवियोगे राजा दशरथ, तत्कालचि हो मृत झाला ।। ५ ।।
गृहकलहास्तव कौरव-पांडव रणांगणी ते लढले हो
आप्त-सोयरे आणि गोत्रज ते प्राणा सर्वस्वी मुकले ।। ६ ।।
गृहकलहाने घोरि महमद जयचंदाने आणियला
पृथ्वीराजा ठार करोनी, मुकला आपण प्राणाला ।। ७ ।।
गृहकलहाने तरुण पेशवा, नारायण तो बळी पडला
आनन्दीने कपट करोनी गादीस्तव पुतण्या वधिला ।। ८ ।।
गृह कलहाने भारतभूची शकले झाली स्वातंत्र्यी
असंख्यांत ते हिन्दू वधिले, उत्तर देशी त्या रात्री ।। ९ ।।

□ □

## ७४. प्रार्थना

दुर्गारमण दर्शनाला । कोणी न्याल का आम्हाला ।। ध्रु० ।।
वेदावतिच्या तीरी राही । नगरी कुरोली पवित्र पाही
नान्दे सिद्ध शंभू भोळा । कोणी न्यालका आम्हाला ।। १ ।।

मस्तकी वाहे गंगापाणी । नागभूषणे गळाही पाणी
कंठी रुद्राक्ष माळा । कोणी न्याल का आम्हाला ।। २ ।।

कैलासाहुनी शंकर आले । शिवनादाने बोलु लागले
वाहू बिल्वदल शिवाला । कोणी न्याल का आम्हाला ।। ३ ।।

शिवलिंगाचे दर्शन घेता । बिल्वदलाने पूजा करता
अन्ती जाइ शिवपदाला । कोणी न्याल का आम्हाला ।। ४ ।।

योगी संतही राजे येती । भावभक्तीने पूजन करिती
नमिती विश्व-देवताला । कोणी न्याल का आम्हाला ।। ५ ।।

या नगरीचे जनही सारे । अन्ती जातिल कैलासारे
नाशी सकल पातकाला । कोणी न्याल का आम्हाला ।। ६ ।।

विष्णु-कविही म्हणे भक्ताशी । पावे सिद्धेश्वर तुम्हासी
सांग काय सिद्ध लीला । कोणी न्याल का आम्हाला ।। ७ ।।

□ □

## ७५. जय शिवराय

छत्रपतींच्या नावे आता, करुया जयजयकार
त्रस्त जनासी मुक्त करोनी, संकट केले पार
पर सत्तेचा कलंक नुरला, या महाराष्ट्रात
तीर कामटे भाले घुसवुनी, यवन काळजात
शिवरायानी स्वराज्य स्थापुनी, दानव निर्दळिला
वाजत गाजत प्रतापगडी तो, अफझुल्ला चिरिला
जीवित घालुनी मृत्यु मुखीते, पेटारी बसले
महाराष्ट्राच्या शिवरायाने, दखखन गाठियले
हास्य वदन ते करून शिवबा, बोलत मातेला
राष्ट्राकरिता दैव आणिले, तुझ्या दर्शनाला
जय जयकारे रायगडावरी, अभिषेकही केला
कीड काढिली पर सत्तेची, कळले शत्रूला
जय जय जय जय महाराष्ट्रा तू, यश दे आम्हाला
यशस्वी रितेने राज्य करू दे, तुझिया जनतेला ॥

कुरोली सिद्धेश्वर, जि. सातारा

□ □

श्री. शामकान्त बाबुराव सातपुते

□

तीन कविता

## ७६. मॉडेल

कर्तव्य आहे यंदा-
पाहण्या निघालो स्थळे
वधुपिते येती-रोजचे-
गोरे कोणी-काळे ॥
म्हणती-आमची-
उपवर-कन्या छान
नाव रूप तिचे
अंग गोरे-गोरे-पान ॥
मनी-खुष-व्हाल
सडसडीत-असे लहान
कितीदा झाले-सांगुन
म्हटले-यावे-जाऊन ॥
जाताच-दारात-रूप
दिसे-अति-विशाल
समजे-ही-तिची-आई
हाती धरी कपाळ ॥
खरेच-असेल-जरी
आहे-तिचीच-आई
पाहुन-तिला-आम्ही
निघायची-केली-घाई ॥
जरी-दिसेल-अशी
पुढे-कन्या-दिसेल-" तशी "

पुढचे-सांगे-कोण
तुम्ही-पडाल-ना-फशी ॥
असेच-मॉडेल-होणार
वाटे-मनी-शंका
फिरूनी-माघारी-आलो
नको-"तसला"-धोका ॥

## ७७ जीवनसार

सुख, शांती असे सार
जीवनाचे खरे आधार ॥ १ ॥
मोह, माया, पैसा
जीवनी अभिलाषा ॥ २ ॥
राग, लोभ मत्सर
जीवनी पाडी अंतर ॥ ३ ॥
स्त्री, सखी, संगत
क्षण देती गंमत ॥ ४ ॥
प्रेम, विषय, ध्यास
जीवनी पदन्यास ॥ ५ ॥
नाटक, सिनेमा, चैन
जीवनी एक तहान ॥ ६ ॥
सद्‌विवेक कृतज्ञता
जीवनात-समानता ॥ ७ ॥
बुद्धी शक्ती युक्ती
जीवनी महान क्रांती ॥ ८ ॥
सूड द्वेशबुद्धी क्रूरता
जीवनी न उरे एकता ॥ ९ ॥
जगी लीनता नम्रता
अलौकिक हो धन्यता ॥ १० ॥

## ७८. वंदेमातरम्

ही आई, तर तुझीच असे
वंदेमातरम् नको कसे ॥ ध्रु० ॥

मानवता; जगी मूल्य वसे
त्यागाला का सीमा असे ॥
स्वातंत्र्यातच अर्थ असे
वंदेमातरम् नको कसे ॥ १ ॥

ही आई, तर तुझीच असे
वंदेमातरम् नको कसे

शेजारी असता उपाशी
तूच का ढेकर देशी ॥
सहृदयता, तव मनी वसे ॥ २ ॥

ही आई, तर तुझीच असे
वंदेमातरम् नको कसे

जगणे, मरणे देवाधीन असे
नसता कारण तू का होतसे ॥
शेजारी तुला हवेत जसे
वंदेमातरम् नको कसे ॥ ३ ॥

ही आई, तर तुझीच असे
वंदेमातरम् नको कसे ॥

ही का भूमी तुझी नसे
धर्म तुझा तो थोर असे ॥
सुजला-सुफला ही भूमी वसे
वंदेमातरम् तुला नको कसे ॥

ही आई, तर तुझीच असे
वंदेमातरम् नको कसे ॥

४२१ शनिवार पेठ, पुणे ३०.

सौ. सीता कुलकर्णी

( के. विनया )

□ सहा कविता

## ७९. मधु वनामधे फुले वसन्त

मधु वनामधे फुले वसन्त ॥ धृ० ॥
मधुमासाची मधुर गोडी
नामस्मरणी उपजे आवडी
भक्तीगंध हा असे अनन्त ॥ मधु० ॥ १ ॥
तडाग मध्य पद्म विकसती
मकरंदही ते वाहू लागती
सुरभी येई मना पसन्त ॥ मधु० ॥ २ ॥
मधुगुंजन हे भृंगततींचे
स्वमाधुर्य गंधर्वांचे
सान्द्र परागी ललामभूत ॥ मधु० ॥ ३ ॥
आम्र तरूंना बहार आला
कोकिळ कूजित रंग बहरला
मयुरही नृत्य करि तालात ॥ मधु ॥ ४ ॥
पुष्प राणीचा डौल डोलता
शुभ्र माधवी संगे क्रीडता
वायु लकेर सौजन्यात ॥ मधु० ॥ ५ ॥
अहा सुधांशु रम्य भासला
तेजोवलयी दीप दीपला
प्रमुदित मतिमम आनंद जात ॥ मधु० ॥ ६ ॥

□ □

## ८०. पुष्पानंद

फुलले प्रफुल्ल फूल उधळी अहा आनंद ।। धृ० ।।

हे सान सान पुष्प गुलजार नी गुलाबी
मृदु कोमलांग दलही किती शोभती गुलाबी
यांशिक श्रेष्ठता ती पाहून हो आनंद ।। फुलले ॥१॥

विनम्र नम्र कुसुमा मधु गंध माधुरी ये
उन्मुक्त दान परता वायुही स्पर्शण्या ये
मंदस्मिता फुलांना पाहून हो आनंद ॥ फुलले० ॥२॥

या शान्त शुद्धकाला, सामिप्य साधतांना
सद्‌गंध पुष्पितेचा उत्कर्ष पाहतांना
सात्त्विक अन्तरात भरला कसा आनन्द ।।फुल.।।३।।

पुष्पास स्पर्शतांना रोमांच ते उभे की
हे विश्व ईशरूप हो भास हा मला की
सुदूर दिव्य दृष्टी अन् दिव्य तो आनन्द ।।फुल. ।।४।।

मित्रासमान मित्र तेजस्वी हो जगाला
नव दान जीवनाचे सप्रेम दे फुलाला
निर्व्याज नि प्रसन्न लुटला असा आनन्द ।।फुल.।।५।।

हा कीर्तिरूप गंध ब्रह्मस्वरूप वाटे
हे पाहतांच पुष्प संतोष फार दाटे
ॐकार नाद नादे होतो मला आनंद ।। फुल. ।। ६ ।।

□ □

# ८१. हे मुकुंद

उन्मुक्त क्रीडसी याच मार्गशीर्ष यामिनी ॥ ध्रृ० ॥

नील गगन पूर्ण चन्द्र पौणिमा
धुन्द चान्दणे ही हा धवल चन्द्रमा
उपमेय उपमान तूंच स्पष्ट लोचनी ॥ उन्मुक्त ॥ १ ॥

रातराणी पुष्प खुलत होत धुन्द वाटिका
जाईजुई विकसती नटती नाट्यनिटिका
मंडपांत डोलतात येत गंध कुंजातुनी ॥ उन्मुक्त ॥ २ ॥

प्रसन्न वदन गोपबाल येत बालिका
शुद्ध प्रीत कृष्णकान्त येत राधिका
मस्त वायु मस्त वारी नाव सोडूनी ॥ उन्मुक्त ॥ ३ ॥

रम्य काल, रम्य बाल, रम्य नाव चालते
रम्य तान, रम्य गान, रम्य सूर छेडते
शान्त चित्त, शान्त तीर वाहते ही वाहिनी ॥ उन्मुक्त ॥ १ ॥

□ □

## ८२. तूं चंद्रमा नभात

तूं चन्द्रमा नभात ॥ ध्रु० ॥
सत् तेज भासमान
का आज सान सान
अन् कोर रूप येथ ॥ तूं चन्द्रमा ॥ १ ॥
नील प्रदेश सारा
धी वारी काय खारा
नौके समान त्यात ॥ तूं चन्द्रमा ॥ २ ॥
निलांबू स्वच्छ हसरे
कमला समान तारे
विहरेमी कलपनेत ॥ तूं चन्द्रमा ॥ ३ ॥
अरुणास साथ घेऊन
उषा ही तेज उजळून
रविराज काय येत ॥ तूं चन्द्रमा ॥
या स्वागतास भाट
सुषमा ही झगझगाट
आलास का वसन्त ॥ तूं० ॥ ५ ॥
आलाप कोकिळेचे
मधुगान पाखरांचे
सारेही हर्षयुक्त ॥ तूं० ६ ॥
मननास शान्त वेळ
चिन्तीत सर्व काळ
तो तूं हवास साथ
॥ तूं चन्द्रमा० ॥ ७ ॥

□ □

## ८३. मी पाही प्रभूला

सांध्य समय मी पाही प्रभूला ॥ ध्रु. ॥
अलग ओष्ठ ही दंतपंगती
शुभ्र गुलाबी वर्ण शोभती
स्मित हास्यी हा बाळ हासला ॥ सांध्य ॥ १ ॥

फुले गुलाब सुंदर बाग
कुन्द कळी अन् चढेही रंग
अवतीभवती मोद बिखुरला ॥ सांध्य. ॥ २ ॥

आला समिन्दर खुशी खुशीत
संथही पाणी नावा त्यात
मिळे सुसंधी मंदवायुला ॥ सांध्य ॥ ३ ॥

बुद् बुद् तारे नीलसा सागर
डोले डोलतो चन्द्र मनोहर
ये भरती मग आनन्दाला ॥ सांध्य. ॥ ४ ॥

गमे मला ही प्रणव रूपता
सोऽहं ची का सुंदर तमता
एकतान मी तद् रूपाला ॥ सांध्य. ॥ ५ ॥

□ □

## ८४. तोच कृष्ण का

आश्चर्यान्वित मधुतर वाळा
बहर आला या काव्य लतेला
फुलली पुष्पे फुलल्या वेली
वायुसंगे करिती केळी ।।

स्वच्छ जलाने तडाग भरले
रंगी विरंगी फुलली कमले
सांद्र परागी मधु गुंजन हे
रव माधुर्य भृंग विहरले ॥

पक्षी उठले नभी संचरती
खुशी खुशीने गायन गाती
आळविती का प्रभुला सारे
आनंदाश्रु नयनी झरारे ।

मंगल मंगलशा समयाला
डोंगर शिखरी रवि उदयाला
फेकित किरणे तरू शिरावर
सुवर्ण कान्ती घराघरावर ॥

बालक छोटे राना निघती
घेऊन साथ वत्स धेनुती
शोधिती सारे कृष्ण सख्याते
बासरी नादे रमवी ज्याते

तोच कृष्ण का मुरलीवाला
ॐ स्वरूपी झंकृत झाला
उन्मनीच्याही पलिकडे जो
एक एकला सत् तत्त्वी जो ।।

१३५३ शुक्रवार पुणे २

REFBK-0022236